परिवहन समितीच्या गुरूवार **दिनांक २९—०६—२०१७** रोजी **दुपारी ०१:००** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | **सभापती** |
| **2.** | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | **सदस्या** |
| **3.** | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| **4.** | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | **सदस्या** |
| **5.** | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| **6.** | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |
| **7.** | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | **सदस्य** |
| **8.** | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| **9.** | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | **सदस्य** |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. सौ. विद्या योगेश मडावी | **सदस्या** |
| **2.** | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | **सदस्या** |
| **3.** | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | **सदस्य** |
| **4.** | **श्री. संदीप चंद्रभान जाधव<br>सभापती स्थायी समिती — पदेन सदस्य** | **सदस्य** |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| **1.** | **श्री. शिवाजी जगताप** | **परिवहन व्यवस्थापक** |
| **2.** | **श्री. हरिष दुबे** | **निगम सचिव** |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ०८:—** मनपा परिवहन विभागाचा आकृतीबंध शासनाच्या मान्यतेस्तव पाठविण्यात आला आहे. आस्थापना पदनिर्मिती प्रक्रियेस लागणारा कालावधी तसेच सध्या विभागाच्या कामामध्ये झालेली प्रचंड वाढ लक्षात घेता व परिवहन विभागाकडे पुरेसा अधिकारी वर्ग नसल्याने सेवानिवृत्त अधिकारी यांच्या तज्ञसेवा करारपध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत शासन निर्णय क्र. संकिर्ण २७१५/प्र.क्र. — १००/१३,

दि. १७/१२/२०१७ सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिशानिर्देश व महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३४८ अन्वये परिवहन व्यवस्थापक व कलम ३४९ अन्वये मा. परिवहन समिती यांचे विहीत अधिकाराअंतर्गत तज्ञ सेवानिवृत्त अधिकारी यांना विवक्षित कामासाठी करार पध्दतीने कामासाठी नियुक्ती देण्यासंदर्भात खालील पदांचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) आस्थापना, प्रशासकीय तथा मनुष्यबळ विकास अधिकारी — १ पद

२) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) — १ पद

३) स्टेनो टायपिस्ट (इंग्रजी/मराठी) — २ पद

याकरीता वरील नमुद शासन निर्णयानुसार निवड प्रक्रिया व जाहिरातीद्वारे नियुक्ती चा विषय समितीने विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ०९:—</u> परिवहन विभाग मनपाद्वारे जूने ऑपरेटर मे. व्ही.एन.आय.एल. यांचा करारनामा रदद् करून दि. ०१/०३/२०१७ पासुन संपुर्ण शहरबस वाहतुक अधिग्रहीत करून नियुक्त केलेले ०३ ऑपरेटर्स् यांचेद्वारे चालविण्यात येत आहे. या ०३ डिझेलबस ऑपरेटर्स् यांना डेपोकरीता तात्पुरत्या स्वरूपात दिलेल्या जागा व त्यांचेद्वारे संचलीत करावयाच्या स्टॅडर्ड व मिडी बसेसच्या संख्येबाबत व सद्य:स्थितीत चालविण्यात येणाऱ्या बसेसबाबतचे विवरण सोबतच्या 'परिशिष्ट — अ' मध्ये संलग्न करण्यात येत आहे.

## 'परिशिष्ट — अ'

### डिझेल बस ऑपरेटर चालनिय सद्य:स्थिती

| अ. क्र. | ऑपरेटरचे नांव | बस डेपो करीता तात्पुरती दिलेली जागा | जागेचे क्षेत्रफळ | क्षेत्रफळा नुसार बसेस ची कमाल संख्या | **RFP** नुसार चालवावयाच्या बसेसची संख्या | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्टॅडर्ड बस | मिडी बस | |
| १) | मे. ट्रव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस, (नागपूर) प्रा. लि. नागपूर | खापरी नाका वर्धा रोड | ९५०७. ४४ Sq.M | ६० | ७९ | ५० | खापरी जागेमध्ये इथेनॉल पेट्रोल पंप अंतर्भुत आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हिंगणा नाका क्र. ०९ | ४०८९ Sq.M | ३० (मेट्रो स्टेशन करीता याच जागेमध्ये काम सुरू आहे. | | | |
| २) | मे. आर. के. सिटी बस ऑपरेशन्स, (नागपूर) प्रा. लि. नागपूर | पटवर्धन मैदान सिताबर्डी | ७४५१ Sq.M | ९० | ७९ | ५० | |
| ३) | मे. हंसा सिटी बस सर्व्हीसेस, (नागपूर) प्रा. लि., नागपूर | ऑरेंट स्ट्रिट (जयताळा) हिंगणा रोड | १२,२०० Sq.M | १४७ | ७९ | ५० | सदर जागेत VNIL यांचे रिअर इंजिन बसेस १०० पेक्षा जास्त उभ्या आहेत. |
| | | झिरो माईल | १४०७.२८ Sq.M | येथे रोकड विभाग नसल्याने व जागेचे क्षेत्रफळ कमी असल्याने बस डेपोच्या उपयोगाची नाही. | | | |

वरीलप्रमाणे तिनही डिझेलबस ऑपरेटर्सद्वारे अनुक्रमे ८६—८६—८६ अश्या २५८ + ०५ ग्रीन बसेस अश्या २६३ बसेसची वाहतुक सुरू आहे. मनपा मालकीच्या जुन्या २३७ स्टॅंडर्ड बसेस व ऑपरेटर यांचे मालकीच्या १५० मिडी बसेसचे संचालन अनिवार्य आहे. तसेच RFP मधील कलम क्र. अन्वये तिनही डिझेलबस ऑपरेटर्स् यांना

प्रत्येकी १५ मिनी बसेस अश्या एकूण ४५ बसेस संचालीत करण्याची परवानगी देणेबाबत संपुर्ण स्वेच्छाधिकार देण्याबाबत अधिकार महानगरपालिकेचा आहे.

करीता नमुद डेपोच्या जागांमध्ये संचालित करावयाच्या बसेसची संख्या लक्षात घेता मिनी बसेस संचालित करावयाच्या निर्णयास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकुण ४५ बसेसला एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १०:— नागपूर शहरात इलेक्ट्रीक बसची वाहतुक प्रायोगिक तत्वावर (पायलट प्रोजेक्ट) द्वारे कार्यान्वित करण्यास कार्योत्तर मान्यता घेण्याचा प्रश्न विचारात घेतला,

नागपूर शहरात ०१ इलेक्ट्रीक टाटा कंपनी बस प्रायोगिक तत्वावर चालविण्याचा प्रस्ताव मे. ओला इलेक्ट्रो मोबीलिटी, प्रा. लि. यांचेवतीने परिवहन विभागाला सादर केलेला आहे. परिवहन समिती गठीत होण्यापुर्वीचा हा प्रस्ताव असल्याने, मा. आयुक्त यांचे दि. १५/०५/२०१७ रोजीचे प्राप्त प्रशासकीय मान्यतेनुसार विभागाच्यावतीने सिटी हेड, मे. ओला इलेक्ट्रो मोबीलिटी, प्रा. लि. यांना पत्र क्र. १२९, दि. १८/०५/२०१७ रोजी अन्वये ''Approval for operating Electric Bus in Nagpur'' निर्गमित करण्यात आले.

दि. २६/०५/२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन तसेच मा. केंद्रिय मंत्री, परिवहन, रस्ते व दळणवळन यांचे शुभहस्ते या प्रायोगिक तत्वावर संचालित होणाऱ्या इलेक्ट्रीक बसचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला आहे.

चालकाची नियुक्ती व बसच्या संपुर्ण खर्चाचे ''दायित्व'' ओला कंपनी यांची राहणार असून ही बस वर्धमान नगर/वाठोडा ते विमानतळ मार्गे सिताबर्डी या मार्गावर चार्जिंग युनिट पूर्णत: कार्यान्वित झाल्यानंतर या मार्गावर धावणार आहे.

मनपाचा सहभाग व दायित्व

१) मनपाद्वारे दोन महिन्याच्या कालावधी करीता पायलट बेसिसवर ०१ इलेक्ट्रीक बस चालविण्याची परवानगी देणे.

२) या बसचा मार्ग वर्धमान नगर ते विमानतळ मार्गे बर्डी अअसा प्रस्तावित असून त्यास परवानगी देण्यास हरकत नाही.

३) सदर इलेक्ट्रीक बस ही वातानुकुलीत नसल्याने नॉन प्रिमियम सेक्टर मध्ये आहे. करीता या फेरीचा भाडे दर मनपा शहरबस सेवेचे प्रचलित डिझेल बसचे भाडे दरानुसार आकारणी करणे योग्य राहील.

४) कंपनीच्या मागणीनुसार या बसचे द्वारे मिळणारे उत्पन्न हे कंपनीच्या नावे वर्ग करण्यास कुठलीही हरकत नाही. तथापी मनपाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या वाहकाचे वेतन मिळणारे उत्पन्नातुन वजा करणे आवश्यक राही.

५) सदर बसमध्ये शहरबस वाहतुकीतील कुठलेही प्रवासी/पासधारक हे प्रवासात अनुज्ञेय राहतील.

नागपूर शहरात ०१ इलेक्ट्रीक टाटा कंपनी बस प्रायोगिक तत्वावर संचालित होण्याकरीता वरील १ ते ५ मुद्यांना कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक ११:— नागपूर शहरबस संचालनाचे कार्य सध्या ०३ रेड बस ऑपरेटर, ०१ वातानुकुलीत ग्रीन बस ऑपरेटर व यावर नियंत्रक म्हणून आय.बी.टी.एम. ऑपरेटरची नियुक्ती मनपाद्वारे करण्यात आलेली आहे. सध्या शहरबस प्रवासात विद्यार्थी, अंध, अंपग, स्वातंत्र संग्राम सैनिक यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नियमानुसार व मनपा शाळेतील शिकणारे विद्यार्थ्यांना १०० टक्के सवलत देण्यात येत आहे. मात्र जेष्ठ नागरिकांना शहरबस प्रवासात सवलत देण्यात येत नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे शहरबस संचालनात जेष्ठ नागरिकांना सवलत देण्यात येत नाही केवळ ग्रामिण प्रवासात ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना शासनाद्वारे विद्यार्थी, अंध, अंपग, स्वातंत्र संग्राम सैनिक व जेष्ठ नागरिकांना प्रवासात देण्यात आलेली सवलत प्रतिपुर्तीची रक्कम देण्यात येत आहे. नागपूर शहरबस संचालनाचे कार्य महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे वर्ष २००७ पुर्वी करण्यात येत होते व मात्र वर्ष २००७ नंतर मनपा मार्फत नियुक्त खाजगी कत्रांटदारद्वारे नागपूर शहरबस संचालनाचे कार्य सुरू आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा मध्ये असलेले नियमानुसार नागपूर शहर बस प्रवासात विद्यार्थी, अंध, अंपग, स्वातंत्र संग्राम सैनिकांना प्रवासात दिलेली सवलत रक्कम मिळण्याबाबत महाराष्ट्र शासनास बरेच पत्राद्वारे मागणी करण्यात आली. मात्र अजुनपर्यंत अप्राप्त आहे. तथापि महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. STC/०८१२/७७९, दि. १४/०२/२०१४ अन्वये नागपूर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने सवलत प्रतिपुर्ती मनपाने स्वत: करावी, असे नमुद आहे.

नागपूर शहरबस संचालनात जेष्ठ नागरिकांना सवलत देण्याचे निश्चित झाल्यास खालील नमुद बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१) जेष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्षे गृहीत धरण्यात यावे, कारण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये ६५ वर्षे गृहीत धरण्यात आलेले आहे.
२) जेष्ठ नागरिकांना प्रवासात वाहकाला त्यांचे कडे असलेले आधार कार्ड, परवाना, पासपोर्ट इत्यादी तत्सम प्रमाणपत्र वाहकास दाखविणे गरजेचे आहे. ज्यामध्ये जन्म तारीख असणे गरजेचे राहील.
३) जेष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत दिल्यास मनपास आर्थिक भुर्दंड स्विकारावे लागणार.
४) ही सवलत केवळ रेड बसेसला उपलब्ध असावी, वातानुकुलीत ग्रीन बसेसमध्ये सवलत देण्यात येवू नये.

५) या योजनेला एखादे नाव सुनिश्चित करण्याबाबत परिवहन समितीला निवेदन आहे.

करीता या १ ते ५ प्रस्तावाचे मान्यतेबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवुन एकमताने जेष्ठ नागरिकांना सवलत देण्याच्या बाबींवरील मुद्या क्रमांक १ मध्ये दिलेल्या जेष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्षांमध्ये बदल करून ६० वर्षे गृहित धरण्यात यावे असे मा.सदस्य श्री. नितीन साठवणे यांनी दिलेल्या सुचनेस तसेच जेष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलत योजनेस 'भारतरत्न' अटलबिहारी वाजपेयी व शैक्षणिक सहल, क्रिडा स्पर्धा, विद्यार्थी व इतर घटकांना सवलत देण्याच्या योजनेस पंडीत दिनदयाल उपाध्याय पथ अंत्योदय हे नाव देण्यास समितीने एक मताने मंजुरी प्रदान केली.

श्री. नितीन साठवणे :— मा.सभापती महोदय मागील कित्येक दिवसापासुन व्ही. एन.आय.एल. च्या १०० जुन्या बसेस जयताळा येथील ऑरेंज स्ट्रीट येथे उभ्या आहेत त्या केव्हापर्यत हटविण्यात येणार आहे.

श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.सभापती महोदय, व्ही.एन.आय.एल. च्या बसेस म.न.पा. च्या जागेवरुन हटविण्यासंदर्भात व्ही.एन.आय.एल. ला वारंवार नोटीस देण्यात आलेल्या आहेत परंतु सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे या संदर्भात पाठपुरावा परिवहन विभागातर्फे सुरु आहे, व्ही.एन.आय.एल. च्या बसेस उचलुन त्या दुस—या ठिकाणी नेण्याकरिता जागेचा शोध घेणे सुरु आहे या प्रकरणामध्ये म.न.पा. कडुन अधिवक्ता श्री काझी यांची नियुक्ती केली आहे. १०० गाडयांच्या संदर्भात म.न.पा. कडुन असा स्टॅन्ड घेण्यात आला की, त्या १०० गाडयांचे गव्हर्नमेंट ऑक्शन करिता ई — टेंडरचे पैसे न्यायालयामध्ये जमा राहील ज्यांच्या बाजुने निकाल लागेल त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सभापती :— या संदर्भात लवकरात लवकर जागेचा शोध घेवुन त्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पुर्ण करावी.

श्री.प्रविण भिसीकर :— मा.सभापती महोदय, लोकसंख्येनुसार शहरामध्ये किती बसेस असणे अपेक्षीत आहे त्या संदर्भात काय नियम आहे.

श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.सभापती महोदय, १० लाख लोकसंख्येमागे ४०० बसेस असायला पाहिजे. नागपूर शहरातील लोकसंख्या २०११ च्या

जनगननेनुसार २६ लक्ष आहे त्या अनुषंगाने नागपूर शहरात १०५० बसेस असायला पाहिजे.

सभापती :— बस स्थानक हा विभाग वाहतुक विभागाकडे आहे तो परिवहन विभागाकडे घेण्यात यावा.

श्री.प्रविण भिसीकर :— मा.सभापती महोदय, मागे १०० बस स्थानक बांधण्याकरिता त्याचे नियमानुसार टेन्डर झाले आहे काय किंवा त्यावर जाहिरातीचा अधिकार कोणाला आहे ते तपासण्यात यावे त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये बस स्थानकांचे निर्माण करण्याकरिता परिवहन विभागाकडुन एक प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे देण्यात यावा त्या अनुषंगाने एक बैठक घेवुन त्या बैठकीमध्ये संबंधित अधिका—यांना बोलविण्यात यावे.

श्री. नितीन साठवणे :— मा.सभापती महोदय, शुअर टेक हॉस्पीटल कडुन बस स्थानक बांधण्याकरिता प्रस्ताव आलेला आहे तो मंजुर करण्यात यावा.

सभापती :— परिवहन व्यवस्थापकांनी या संदर्भात एक ॲग्रीमेंट तयार करुन कालावधी निश्चित करण्यात यावा.

श्री. नितीन साठवणे :— मा.सभापती महोदय, काटोल या मार्गावर बसफे—याची वाढ करण्यात यावी तसेच कोणत्या बसस्टॉप वर किती वाजता बस येणार आहे त्या अनुषंगाने वेळापत्रक तयार करुन ते सर्व बस स्थानकांवर लावण्यात यावे व त्याची एक प्रत सर्व समिती सदस्यांना देण्यात यावी

सभापती :— परिवहन विभागामध्ये जे काही भंगार आहे ते निकाली काढण्याकरिता तीन सदस्यीय समिती तयार करुन तो विषय निकाली लावण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

<u>ठराव क्रमांक १२:—</u> आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर